## निशाणी क्र.५ खालील आदेश

(दि. १८/११/२०२२ )

१. अर्जदारांनी सदरचा अर्ज सामनेवालाविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १२५(२) अंतर्गत दाखल केला असुन रक्कम रुपये १०,०००/- दरमहा स्वतःसाठी व प्रत्येक मुलास रक्कम रूपये ५,०००/- अशी एकूण रक्कम रुपये २०,०००/- अंतरीम पोटगी मिळण्याबाबत प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

### अर्जदाराचे थोडक्यात कथने खालीलप्रमाणेः-

२. अर्जदार क्र. १ आणि सामनेवाला यांचा विवाह दिनांक २२/११/२००८ रोजी हिंदु धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे झाला असून सदर विवाहापासून त्यांना एक मुलगी व एक मुलगा असे दोन अपत्ये आहेत. अर्जदारांच्या कथनानुसार अर्जदार क्र. १ हिचे पहिले लग्न झाले असून घटस्फोटानंतर सामनेवालासह दुसरा विवाह केला आहे. अर्जदारास पहिल्या विवाहापासून एक मुलगा आहे ही बाब सामनेवाल्याला माहित असताना देखील त्याने तिचा मुलासह स्विकार केला. तसेच सामनेवाला अर्जदार क्र. १ आणि तिचा मुलगा यांचा दोघांचा सांभाळ करेन या अटीवर तिने त्याच्यासोबत दुसरा विवाह केला.

३. विवाहानंतर काही वर्षे व्यवस्थित संसार केला. ते काही दिवस बोईसर येथे तर काही दिवस अर्जदाराच्या माहेरी राहिले. त्यानंतर कामानिमित्त दोघे मुंबई (खार) येथे देखील राहिले. तेथे ते दोघेही नोकरी करीत असे. परंतु कामावर जाताना त्यांचे छोटया-छोटया गोष्टीवरून भांडण होऊ लागले. सामनेवाला अर्जदारावर संशय घेऊन भांडण करीत असे व त्यामुळे त्यांनी अर्जदाराच्या अंगावर रॉकेल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. परंतु सदर प्रयत्न अपयशी ठरला.

४. अर्जदार ही सामनेवाल्याच्या घरी सासरी म्हणजेच बिहार येथे गेली असता सामनेवाल्याच्या बहिणी लग्नात हुंडा दिला नाही म्हणून अर्जदारास टोमणे मारत असे. ती तेथे केवळ दोन महिने राहिली. त्यानंतर देखील सामनेवाला याने अर्जदारास चारित्र्यावर संशय घेऊन दारूच्या नशेत शिवीगाळ व मारहाण केली. त्याबाबत अर्जदार हिने पोलीस ठाणे बोईसर येथे तक्रार देखील दिली होती. परंतु अर्जदार व सामनेवाला यांच्यात समझोता झाल्यामुळे तिने केस मागे घेतली.

५. अर्जदाराच्या मते सामनेवाला गुजरात येथे चांगल्या पगाराच्या नोकरीवर असून देखील त्याने अर्जदारांच्या पालनपोषणाची जबाबदारी घेण्याचे जाणीवपुर्वक टाळले आहे. म्हणून अर्जदाराने प्रस्तुतचा अंतरीम पोटगीबाबतचा अर्ज मंजूर होण्याची प्रार्थना केली. आहे.

६. प्रस्तुत प्रकरणाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर सामनेवाला वकीलांमार्फत हजर झाला व त्याचे म्हणणे नि.क्र. १३ वर दाखल केले. सामनेवाला याने अर्जदार क्र. १ सोबतचा विवाह, त्यांचे नातेसंबंध कायम असल्याचा मजकूर मान्य केला असुन इतर मजकूर नाकारला आहे. सामनेवाला याने अर्जदाराने तिच्या पहिल्या विवाहाची व त्यापासून असणा-या अपत्याची बाब त्याच्यापासून लपवून ठेवल्याबाबतची कथने केली आहेत. सामनेवाल्याच्या मते अर्जदाराचे संसारामध्ये कधीही लक्ष नव्हते. ती तिच्या माहेरची परिस्थिती चांगली असल्यामुळे सारखी माहेरी जाऊन राहत असे. सामनेवालासोबत राहून अर्जदारास सारखे काम करत लागल्यामुळे तिला ते पसंत नव्हते व त्यामुळे ती स्वतःच्या इच्छेने माहेरी राहत असे. अर्जदार ही नोकरी करीत असून तिला अंदाजे रक्कम रुपये १०,०००/- ते १२,०००/- मासिक उत्पन्न मिळत असून सामनेवालाचे शिक्षण कमी असल्यामुळे त्यास केवळ रक्कम रूपये ८,०००/- इतका पगार असल्याचे त्याच्या म्हणण्यामध्ये नमूद केले आहे. त्याचप्रमाणे सामनेवाला याच्यावर त्याची आई व इतर अवलंबून असल्याची बाब देखील नमूद केली आहे. त्यामुळे अर्जदाराच्या मागणीप्रमाणे पोटगी देण्यास सामनेवाला असमर्थ असून तो आजरोजी देखील अर्जदारास प्रामाणिकपणे नांदविण्याची कथने करून प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची प्रार्थना करतो.

७. अर्जदार आणि सामनेवाला यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उभय पक्षांची कथने तसेच अभिलेखावरील प्रथमदर्शी पुरावा लक्षात घेता खालील मुद्दे माझ्या विचारार्थी येतात, त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही सामनेवालाकडून रक्कम रु. १०,०००/- स्वतःसाठी व प्रत्येक मुलास रक्कम रूपये ५,०००/- असे एकूण रक्कम रूपये २०,०००/- दरमहा इतकी अंतरीम पोटगी मिळविण्यास पात्र आहे का? | अंशतः होकारार्थी. |

२. काय आदेश ? अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. १ बाबत :-</u>**

८. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार आणि सामनेवाला यांच्यातील विवाह संबंध व तसेच दोन अपत्ये असल्याची बाब उभयपक्षांनी मान्य आणि कबूल केलेली आहे. अर्जदाराने तिच्या अर्जात सामनेवाला याच्यामार्फत तिच्यासोबत कौटुंबिक हिंसाचाराच्या काही घटना केल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे सामनेवाला याने अर्जदारांचा जाणीवपुर्वक सांभाळ करणे नाकारल्याची बाब देखील नमूद केलेली आहे. सदर सर्व बाबी या सामनेवाला याने नाकारल्या असून तो अर्जदारांचा सांभाळ करण्यास प्रामाणिकपणे तयार असल्याचे सांगतो.

९. उभयपक्षांची कथने विचारात घेता सध्याची स्थिती ही अगदी प्राथमिक असून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १२५ मध्ये नमूद तरतुदींचा विचार करता केवळ अर्जदार व सामनेवाला यांच्यातील विवाहसंबंध आणि सामनेवाल्यामार्फत नाकारण्यात आलेल्या पालनपोषणाची जबाबदारी इत्यादी बाबींची प्रथमदर्शी पडताळणी करणे न्यायोचित होईल.

१०. ज्याअर्थी सामनेवाला याने अर्जदारासोबत असणारे वैवाहिक संबंध आणि अपत्य असल्याची बाब मान्य केली आहे त्याअर्थी आजरोजी देखील त्यांचे वैवाहिक संबंध कायम असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते. असे असताना नक्कीच अर्जदारांच्या पालनपोषणाची नैतिक जबाबदारी ही सामनेवाल्याची आहे. परंतु सामनेवाला व अर्जदार विभक्त राहत असून सामनेवाल्याने अर्जदारांच्या उदरनिर्वाहाकरीता केलेल्या आर्थिक तरतुदींचा कोणताही सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर दिसून येत नाही. त्याचप्रमाणे कोणतीही विवाहीत स्त्री दोन अपत्ये असतांना देखील संयुक्तिक कारणांशिवाय आपल्या पतीपासून वेगळी राहू शकत नाही.

११. अर्जदार आणि सामनेवाला यांच्यातील वैवाहिक संबंध कायम असल्यामुळे सामनेवाला याने त्यांच्या उदरनिर्वाहाकरीता पोटगी देणे गरजेचे आहे. परंतु सदर पोटगीची रक्कम ठरविण्याकरीता उभयपक्षांमार्फत सामनेवाला याच्या उत्पन्नाबाबत अथवा शिक्षणाबात कोणताही प्रथमदर्शी पुरावा दाखल केलेला नाही. अशा परिस्थितीत, किमान वेतन अधिनियम अंतर्गत तरतुदी नुसार एखादा सकुशल

मजूर देखील रक्कम रुपये ४००/- प्रतिदिन कमवू शकतो. त्याचप्रमाणे सामनेवाला देखील रक्कम रूपये ४००/- प्रतिदिन असे उत्पन्न सहज घेवू शकतो.

१२. सामनेवाला मार्फत त्याच्यावर इतर असणा-या जबाबदा-यासंबंधित कोणताही प्रथमदर्शी पुरावा दाखल न केल्यामुळे त्याच्यावर इतर कोणीही अवलंबून नाही असे गृहित धरणे न्यायोचित होईल. उभय पक्षांची आर्थीक व सामाजीक परिस्थिती लक्षात घेता सामनेवालाकडून अर्जदारांच्या उदरनिर्वाहा करीता एकत्रितपणे दरमहा रक्कम रुपये ३,५००/- मात्र इतकी अंतरीम पोटगी अर्ज दाखल तारीख म्हणजेच दिनांक ०१/१०/२०१८ पासून मुळ अर्जाच्या निकालापर्यत दिल्यास न्यायोचीत होईल. सबब, मुद्दा क्र. १ करीता अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत :-</u>**

१३. सबब, उपरोक्त विवेचनांचा विचार करता, अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र असून मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात आलेला आहे.

२. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १२५ (२) अन्वये, सामनेवाला याने अर्जदारांच्या उदरनिर्वाहाकरीता मुळ अर्ज दाखल तारखे पासून दरमहा एकत्रितपणे अंतरीम पोटगी म्हणुन दरमहा रक्कम रुपये ३,५००/- मुळ अर्जाच्या निकालापर्यंत द्यावे.

३. सामनेवाला याने अंतरीम पोटगीची रक्कम ही दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत अर्जदारास देवू करावी.

५. प्रस्तुत अर्जाचा खर्च मुळ अर्जात समाविष्ठ समजण्यात यावा.

खुल्या न्यायालयात अधिघोषीत.

ANUJA ANIL KALE
Digitally signed by ANUJA ANIL KALE
Date: 2022.11.18 00:52:11 +0530

(श्रीमती अ. अ. काळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०३, पालघर

पालघर
दिनांकः १८/११/२०२२

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

Name of the Stenographer :- Smt P.K.Tamore
Court :- Smt. A.A.Kale, 3rd Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Palghar
Date :- 18/11/2022
Order Signed by the presiding officer on :- 18/11/2022
Order uploaded on :- 19/11/2022